## उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय @ अमरावती अभिनव कार्यक्रमांतर्गत
## उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना.श्री. उदय सामंत विद्यार्थ्यांशी साधणार संवाद
## १ ऑक्टोबर रोजी विद्यापीठात कार्यक्रम

अमरावती -

महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे संयुक्त विद्यमाने उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय @ अमरावती हा अभिनव उपक्रम विद्यापीठाच्या डॉ.के.जी. देशमुख सभागृहामध्ये दि. १ ऑक्टोबर, २०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे मंत्री ना.श्री. उदय सामंत, महिला व बालविकास मंत्री तथा अमरावती जिल्ह्याच्या पालकमंत्री ना.श्रीमती यशोमती ठाकूर, अन्न व औषधे प्रशासन मंत्री ना.डॉ. राजेंद्र शिंगणे व शालेय शिक्षण तथा महिला व बालविकास, कामगार राज्यमंत्री तथा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री ना.श्री. ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू तसेच अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे राहणार आहेत. याशिवाय उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव, संचालक, सहसंचालक, शासनाचे अधिकारी, विद्यापीठाचे अधिकारी आणि पाचही जिल्ह्यातील खासदार व आमदार महोदय उपस्थित राहणार आहेत.

सदर कार्यक्रमांतर्गत विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राचार्य, शिक्षकेत्तर कर्मचारी, शैक्षणिक संस्था आदी घटकांच्या अडचणी सोडविण्याकरिता उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना.श्री. उदय सामंत हे प्रत्यक्षरित्या विद्यापीठात उपस्थित राहून त्यांचेशी संवाद साधून त्यांच्या अडचणी तसेच प्रश्न सोडविणार आहेत. 'उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय आपल्या दारी' हा अभिनव उपक्रम मंत्री महोदय ना.श्री. उदय सामंत यांच्या संकल्पनेतून साकार झाला असून या उपक्रमाला आजवर महाराष्ट्रातील इतर विद्यापीठांमध्ये प्रचंड प्रतिसाद लाभला आहे. अमरावती विद्यापीठामध्ये या उपक्रमासाठी जय्यत तयारी विद्यापीठ प्रशासनाने कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे व कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली केली आहे.

विद्यार्थी, पालक व सर्व हिततुल्य घटकांकडून आभासी पद्धतीने प्रश्न मागविले असून ते प्रश्न प्रत्यक्षरितीने मंत्री महोदय सोडविणार आहेत. ज्यांनी प्रश्न पाठविले आहे, त्यांना प्रत्यक्षरित्या विद्यापीठ परिसरातील डॉ.के.जी. देशमुख सभागृहाजवळील सभा मंडपामध्ये उपस्थित रहावयाचे आहेत. याशिवाय ज्यांना कार्यक्रमाच्या दिवशी प्रश्न विचारावयाचे असतील, त्यांनी लिखीत स्वरुपात प्रश्न आणावयाचे आहेत. कृपया याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने करण्यात येत आहे.

याशिवाय मंत्री महोदयांच्या हस्ते कोविड योद्धांचा सत्कार होणार असून ते गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहे. 'माझी वसुंधरा' कार्यक्रमांतर्गत मंत्री महोदयांच्या हस्ते विद्यापीठ परिसरात वृक्षारोपण करण्यात येणार आहे. विद्यापीठातील सर्व शिक्षकांशी सुद्धा मंत्री महोदय संवाद साधून त्यांचेकडून उच्च शिक्षणातील गुणवत्ता सुधारण्यासंदर्भात महत्वपूर्ण चर्चा करणार आहेत. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी विविध समित्यांचे गठण करण्यात आले आहे.

तरी सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राचार्य, शिक्षकेत्तर कर्मचारी, शैक्षणिक संस्था, पाचही जिल्ह्यातील खासदार व आमदार महोदय यांनी सदर कार्यक्रमाला उपस्थित रहावे, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने करण्यात येत आहे.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दि. २९/०९/२०२१.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी